**MHST140024252020**

दाखल दिनांक : ११/११/२०२०

नोंदणी दिनांक : १९/१२/२०२०

निकाल दिनांक : २८/०७/२०२६

कालावधी : ०५ व. ०८ म. १७ दि.

**निशाणी क्र. : ८६**

**भाग–'अ'**

**Form No. XXXII**
**(Title Page of the Judgment)**
**(Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual)**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, फलटण, जि. सातारा यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – वि. स. वाघ)**

**नियमित फौजदारी खटला क्र. ३८८/२०२०** अपराध क्र. २५२/२०२०

**CNR NO. MHST140024252020** **निशाणी क्र.**

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | महाराष्ट्र शासन तर्फे, लोणंद पोलिस ठाणे,<br>ता. खंडाळा, जि. सातारा. |
| **उपस्थिती** | सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. एच. बांदल |
| **आरोपी** | **१. रमेश लक्ष्मण शिंदे**<br>वय–७० वर्षे, व्यवसाय – शेती<br>**२. अवधुत रमेश शिंदे**<br>वय–४१ वर्षे, व्यवसाय – शेती<br>**३. विशाल रमेश शिंदे**<br>वय–३६ वर्षे, व्यवसाय – शेती<br>**४. प्रदिप लक्ष्मण शिंदे** |

| | |
|---|---|
| | वय–५० वर्षे, व्यवसाय – शेती<br>**५. रोहीत प्रदीप शिंदे**<br>वय–२० वर्षे, व्यवसाय – शेती<br>**६. वैभव राजेंद्र शिंदे**<br>वय–३४ वर्षे, व्यवसाय – शेती<br>**७. सागर राजेंद्र शिंदे**<br>वय–२८ वर्षे, व्यवसाय – शेती<br>सर्व रा. तांबवे, ता. फलटण, जि. सातारा. |
| **उपस्थिती** | आरोपीतर्फे अधिवक्ता श्री. व्ही. डी. कदम. |

| | |
|---|---|
| **दोषारोप** | भारतीय दंड संहिता कलम ३२६, ३२४, ३२३, १४३, ५०४, ५०६ सहकलम १४९ प्रमाणे |

**भाग–'ब'**

**(Para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)**

| | | |
|---|---|---|
| (१) | घटना घडल्याचा दिनांक | दिनांक १५/०६/२०२० |
| (२) | प्रथम खबर अहवाल दिनांक | दिनांक १६/०६/२०२० |
| (३) | दोषारोप दाखल झाल्याचा दिनांक | दिनांक ३१/१०/२०२० |
| (४) | दोषारोप निश्चिती दिनांक | दिनांक ११/११/२०२१ |
| (५) | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | दिनांक १५/०३/२०२४ |
| (६) | न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवलेली दिनांक | दिनांक २८/०७/२०२६ |
| (७) | न्यायनिर्णयाचा दिनांक | दिनांक २८/०७/२०२६ |

| | | |
|---|---|---|
| (८) | शिक्षेची तारीख, जर असेल तर | नाही. |

## आरोपीचा तपशिल

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनवर आरोपीस मुक्त केल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | फौ. प्र.सं. कलम ४२८ अन्वये किती दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रमेश लक्ष्मण शिंदे | ०७.०७/२०२० | ०७.०७/२०२० | भारतीय दंड संहिता कलम ३२६, ३२४, ३२३, १४३, ५०४, ५०६ सहकलम १४९ प्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | अवधुत रमेश शिंदे | ०७.०७/२०२० | ०७.०७/२०२० | | निर्दोष | निरंक | निरंक |
| ३. | विशाल रमेश शिंदे | ०७.०७/२०२० | ०७.०७/२०२० | | निर्दोष | निरंक | निरंक |
| ४. | प्रदिप लक्ष्मण शिंदे | ०७.०७/२०२० | ०७.०७/२०२० | | निर्दोष | निरंक | निरंक |
| ५. | रोहीत प्रदीप शिंदे | ०७.०७/२०२० | ०७.०७/२०२० | | निर्दोष | निरंक | निरंक |
| ६. | वैभव राजेंद्र शिंदे | ०७.०७/२०२० | ०७.०७/२०२० | | निर्दोष | निरंक | निरंक |
| ७. | सागर राजेंद्र शिंदे | ०७.०७/२०२० | ०७.०७/२०२० | | निर्दोष | निरंक | निरंक |

## भाग–'क'

## (Para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)

## सरकारी साक्षीदार/बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी

## अ–सरकारी साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | धनंजय बाळासो शिंदे | ४८ | पंच साक्षीदार |
| सा.क्र.२ | अभिजीत नंदकुमार शिंदे | ५५ | पंच साक्षीदार |
| सा.क्र.३ | राहुल दिलीप शिंदे | ७१ | फिर्यादी |
| सा.क्र.४ | पांडूरंग सोपानराव शिंदे | ७३ | साक्षीदार |
| सा.क्र.५ | हणमंत यशवंत शिंदे | ७६ | साक्षीदार |
| सा.क्र.६ | दत्तात्रय सोपान शिंदे | ७७ | साक्षीदार |

**ब–बचावपक्ष साक्षीदार**

| **अ.क्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क–न्यायालय साक्षीदार**

| **अ.क्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**सरकारी साक्षीदार/बचावपक्षाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची निशाणी**

**अ–सरकारी**

| **अ.क्र.** | **वर्णन** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ब–बचावपक्ष**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क–न्यायालय**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## ड–जप्त मुद्देमाल

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | सी. एम. आर नं. २७/२०२१ | दोन लाकडांची दांडके, एक लोखंडी कुऱ्हाड |

## न्या य नि र्ण य
## (दि. १३/०७/२०२६)

सरकारी पक्षाची केस थोडक्यात अशी आहे की–

**१.** फिर्यादी राहुल दिलीपराव शिंदे याने पोलिस स्टेशन येथे समक्ष हजर राहुन फिर्याद दिली की, दिनांक १५/०६/२०२० रोजी दुपारी २.३० वाजताचे सुमारास तो चांभारवाडी, ता. फलटण येथील त्याचे शेतात काम करीत असताना फिर्यादीला त्याचा मावसभाऊ हणमंत यशवंत शिंदे याचा फोन आला व त्याने सांगितले की, कापडगांव गावचे हद्दीत वेअरहाऊसचे जवळ असलेले चावर नावचे शिवारात रमेश लक्ष्मण शिंदे हा त्यांना मारहाण करीत आहे. असे समजलेने फिर्यादी तेथे एकटाच गेला. सरकारचे पुढील कथन की, त्यावेळी घटनास्थळी आरोपी क्र. १ ते ७ हे फिर्यादीचे काका सपंत शंकर शिंदे व पांडूरंग सोपान शिंदे यांना हाताने व हातातील दांडक्यांनी मारहाण करीत होते, भांडणे झालेली पाहुन गौरव शिंदे व दत्तात्रय शिंदे तसेच हणमंत शिंदे हे भांडणात आले तेव्हा त्यांनाही आरोपींनी हाताने, लाथा बुक्यांनी व दांडक्यांनी मारहाण केली.

सरकारचे पुढील कथन की, फिर्यादी भांडण सोडवित असल्यामुळे आरोपी रमेश लक्ष्मण शिंदे हा त्याला म्हणाला की, ''तुझा काय संबध, तु इथे का आला''. त्यावेळी सर्व आरोपींनी फिर्यादीला ढकलत, मारत मारत रस्त्याजवळ

आणले व तेव्हाच त्यातील आरोपी रोहीत प्रदीप शिंदे याने हातातील कुऱ्हाडीने उलट्या बाजुने फिर्यादीच्या डोक्यात मारले. त्यामुळे फिर्यादी चक्कर येवुन खाली पडला. त्यानंतर त्यांचेतील लोकांनी त्यांना लोणंद पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी नेले. त्यानंतर त्यास उपचारासाठी सरकारी दवाखान्यात गेले व तेथुन पुढील उपचारासाठी तो सावित्री हॉस्पीटल लोणंद येथे गेले. त्यानंतर त्यांनी आरोपींनी जमीनीच्या वादावरुन भांडणे करुन त्यांना मारहाण केल्याची बाब पोलीस स्टेशनला सांगितली व झाल्याप्रकाराबाबत फिर्यादीने पोलिस स्टेशनला फिर्याद दिली.

**२.** सदर रिपोर्टप्रमाणे गुन्हा क्र.२५२/२०२० भारतीय दंड संहिता कलम ३२६, ३२४, ३२३, १४३, ५०४, ५०६ सहकलम १४९ प्रमाणे नोंदविण्यात आला. संबंधीत तपासी अधिकाऱ्यांनी घटनास्थळ पंचनामा दोन पंचासमक्ष तयार करुन, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करुन, साक्षीदाराचे जाब–जबाब नोंदवुन आरोपींविरुध्द दोषोरापपत्र दाखल केले.

**३.** आरोपींविरुध्द नि.क्र. २७ नुसार माझे पुर्वाधिकारी यांनी दोषारोप ठेवलेला असुन सदरचा दोषारोप आरोपींतांस त्यांच्या बोलीभाषेतुन वाचुन दाखविला व त्याप्रमाणे त्यांचा जबाब नोंदविण्यात आला असता त्यांनी तो अमान्य केला आहे.

**४.** सरकारपक्षाने आरोपीवरील दोषारोप सिध्द करणेकामी एकुण सहा साक्षीदार तपासले व सरकारी पक्षाचा पुरावा संपल्यानंतर आरोपींविरुध्द दोषारोपपुर्ण असा पुरावा आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसार निवेदन निशाणी क्र.७९ ते ८४ नुसार नोंदविण्यात आले.

**५.** सरकारपक्षातर्फे सरकारी वकीलांचा युक्तीवाद ऐकला. तर आरोपीतर्फे श्री. व्ही. डी. कदम वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

**६.** सरकारपक्षाची केस, त्यांनी दिलेला साक्षीपुरावा, उलटतपास,

उभयबाजुंचा युक्तीवाद विचारात घेतल्यानंतर खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित झाले आहेत. मी त्यांचा निष्कर्ष त्यांच्या समोर खालील दिलेल्या कारणमिमांसेवरुन नोंदविलेला आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | सरकारपक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक १५/०६/२०२० रोजी दुपारी २.३० वाजताचे सुमारास मौजे कापडगांव वेअरहाऊस जवळ, ता. फलटण गावच्या हद्दीत आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादी व त्यांचा मावस भाऊ यांना काठ्या, कुऱ्हाडी अशा घातक हत्यारांनी मारहाण करुन जबर दुखापत पोहोचवली व भा.दं.सं. कलम ३२६ सहकलम १४९ प्रमाणे अपराध केला, असे सरकारपक्ष सिध्द करतो काय ? | ...नकारार्थी |
| **२.** | उपरोक्त वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादी व त्यांचा मावस भाऊ यांना लाकडी दांडक्याने व कुऱ्हाडीने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली व भा.दं.सं. कलम ३२४ सहकलम १४९ प्रमाणे अपराध केला, असे सरकारपक्ष सिध्द करतो काय ? | ...नकारार्थी |
| **३.** | उपरोक्त वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादी यांना कुऱ्हाड, काठ्या व चाकु याने इच्छापूर्वक दुखापत केली व भा.दं.सं. कलम ३२३ सहकलम १४९ प्रमाणे अपराध केला, असे | ...नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | सरकारपक्ष सिध्द करतो काय ? | |
| **४.** | उपरोक्त वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाने बेकायदेशीर जमाव केला व भा.दं.सं. कलम १४३ सहकलम १४९ प्रमाणे अपराध केला, असे सरकारपक्ष सिध्द करतो काय ? | ...नकारार्थी |
| **५.** | उपरोक्त वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादी यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा या उद्देशाने किंवा तसे होण्याची संभव असल्याची जाणीव असतांना फिर्यादीचा उद्देशपूर्वक अपमान करुन त्यांना प्रक्षोभीत केले व भा.दं.सं. कलम ५०६ सहकलम १४९ प्रमाणे अपराध केला, असे सरकारपक्ष सिध्द करतो काय ? | ...नकारार्थी |
| **६.** | उपरोक्त वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादी यांना दमदाटी केली व फौजदारीपात्र धाकधपटशहा केला व भा.दं.सं. कलम ५०६ सहकलम १४९ प्रमाणे अपराध केला, असे सरकारपक्ष सिध्द करतो काय ? | ...नकारार्थी |
| **७.** | अंतिम आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**७.** सरकारपक्षाने आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्याचे कामी एकूण सहा साक्षीदार तपासले. सरकारपक्षास संधी देउनही सरकारपक्षाने इतर साक्षीदार तपासलेले नाही.

**<u>मुददे क्रमांक १ ते ६ चे निष्कर्षाबाबतः</u>–**

८. दिनांक १५/०६/२०२० रोजी दुपारी २.३० वाजताचे सुमारास मौजा कापडगांव वेअरहाऊस जवळ, ता. फलटण गावच्या हद्दीत आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादी व त्यांचा मावस भाऊ यांना काठ्या, कुऱ्हाडी अशा घातक हत्यारांनी मारहाण करुन जबर दुखापत पोहोचवली तसेच शिवीगाळ व दमदाटी केली अशी सरकारपक्षाची केस आहे. प्रस्तुत प्रकरणात सरकार पक्षाने फिर्यादीस साक्षीदार क्र. ३ म्हणून तपासले आहे व फिर्यादीने त्याच्या सरतपासात दिनांक १५/०६/२०२० रोजी दुपारी तो त्याच्या गावी असल्याचे, त्यावेळी त्याची व आरोपींची तोंडी बाचाबाची झाल्याचे कथन केले आहे. परंतु फिर्यादीने आरोपींनी त्याला मारहाण केल्याची बाब स्पष्टपणे नाकारलेली आहे. तसेच फिर्यादीने त्याच्या पुढील सरतपासात त्याने फिर्यादीवर त्याची सही असल्याचे मान्य केले आहे परंतु त्यातील मजकुर त्याला माहीत नसल्याचे कथन केले आहे.

९. फिर्यादी सा.क्र.३ याने सरकारपक्षास सहकार्य केले नसल्याने त्याचा उलटतपास घेण्यात आला व त्या दरम्यान त्याने दि. १५/०६/२०२० रोजी तो शेतात काम करत असताना आरोपी त्याचा मावस भाऊ हनुमंत शिंदे यास मारहाण करत असल्याबाबत त्याला हनुमंतचा फोन आल्याचे, तो फोन आल्यानंतर लागलीच घटनास्थळी गेल्याचे, त्याठिकाणी सर्व आरोपी, त्याचे काका यशवंत शिंदे व पांडुरंग शिंदे यांना हाताने व लाकडी दांडक्याने मारहाण करत असल्याचे, त्यावेळी गौरव शिंदे, दत्तात्रय शिंदे व हनुमंत शिंदे यांना देखील आरोपींनी लाथाबुक्क्यांनी व लाकडी दांडक्याने मारहाण केल्याचे, त्यावेळी तो सोडवणुक करण्यास गेला असता आरोपी रमेश शिंदे याने त्याला मारहाण केल्याचे, सर्व आरोपींनी मारहाण करून रस्त्याजवळ आणल्याचे, आरोपी रोहित याने त्याच्या हातातील कुऱ्हाडीच्या उलट्या बाजुने त्याच्या डोक्यात मारल्याचे व त्यामुळे तो चक्कर येऊन खाली पडल्याचे स्पष्टपणे नाकारले आहे.

**१०.** तसेच फिर्यादीने आरोपींनी मारहाण केल्याने त्याला सावित्री हॉस्पीटल लोणंद येथे उपचाराकामी नेल्याचे, पोलीस दवाखान्यात आल्याचे व त्याचा जबाब घेतल्याचे स्पष्टपणे नाकारले आहे. तसेच फिर्यादीने त्याचे, त्याचा भाऊ व आरोपी यांचे दरम्यान आपसात वाद कोर्टाबाहेर मिटले असल्याची बाब मान्य केली आहे व त्याला सदरची केस चालविणे नसल्याचे मान्य केले आहे. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासा दरम्यान फिर्यादीने त्यांचे वाद मिटले असल्याचे, त्याची आरोपींविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे व तथाकथीत घटनेपुर्वी तो घसरुन पडल्याने त्यास मार लागल्याचे त्याने स्पष्ट मान्य केले आहे.

**११.** प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार क्र. ४ ते ६ यांची साक्ष घेण्यात आली त्यांनी त्यांच्या सरतपासात दिनांक १५/०६/२०२० त्यांची व आरोपींची तोंडी बाचाबाची झाल्याचे, आरोपींनी त्यांना मारहाण केली नसल्याचे स्पष्टपणे मान्य केले आहे. सदर साक्षीदारांनी सरकारपक्षास सहकार्य केले नसल्याने त्यांचा उलटतपास घेण्यात आला व त्या दरम्यान त्यांनी आरोपींनी मारहाण केल्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. तसेच आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान वाद मिटले असल्याचे व तथाकथित घटनेपुर्वी पडले असल्याने साक्षीदार क्र. ४ यास मार लागल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

**१२.** साक्षीदार क्र. १ याने त्याच्या सरतपासात पोलीसांनी त्याच्या समक्ष पंचनामा केला नसल्याचे कथन केले आहे. त्यांनी पंचनाम्यावरील सही मान्य केली मात्र मजकुर नाकारला. साक्षीदार क्र. २ याने पोलीसांनी त्याचे समक्ष पंचनामा केल्याचे कथन केले आहे. त्याच्या साक्षीत जप्ती पंचनाम्यास निशाणी ५६ देण्यात आली आहे. सदर साक्षीदाराने उलटतपासादरम्यान तो फिर्यादीच्या भावकीतला असल्याचे मान्य केले आहे. तसेच त्याने पोलीसांनी पंचनाम्याकामी बोलावले नसल्याचे मान्य केले आहे. त्याने कुऱ्हाड जप्त केली त्यावेळी दांड्यासह असल्याचे मान्य केले आहे. तसेच जप्त कुऱ्हाडींसारख्या कुऱ्हाडी बाजारात मिळत असल्याचे मान्य केले आहे. प्रस्तुत प्रकरणी मुळ फिर्यादी व इतर जखमी साक्षीदार हे कुऱ्हाडीने

मारहाण केल्याबाबत कुठेही कथन करत नाहीत. अशा परिस्थितीत साक्षीदार क्र. २ याची साक्ष विचारात घेता येणार नाही.

**१३.** सरकारपक्षाने प्रस्तुत प्रकरणात संधी देऊनही इतर प्रत्यक्षदर्शी साक्षदार तपासलेले नाही. तपासी अंमलदार व वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष नोंदविलेली नाही.

**१४.** फिर्यादीची व इतर साक्षीदारांची साक्ष पाहता त्यांनी गुन्ह्याच्या अनुषंगाने आरोपींबाबत एकाही शब्दाने कथन केलेले नाही. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता आरोपींनी संगणमताने फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ करुन काठ्या कुऱ्हाडीने मारहाण करुन इच्छापूर्वक गंभीर दुखापत केली असल्याचा कोणताही सबळ पुरावा सरकारपक्षाने अभिलेखावर आणलेला नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणात सरकार पक्षाने आरोपींना फिर्यादी व साक्षीदाराने समान उद्देशाने मारहाण करून, शिवीगाळ करून जिवे मारण्याची दमबाजी केली ही बाब शाबीत करण्यास असमर्थ ठरला आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक १ ते ६ यास **नकारार्थी** निष्कर्ष नोंदवित आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता मुद्दा क्रमांक ७ च्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपी क्र. १. रमेश लक्ष्मण शिंदे, आरोपी क्र.२. अवधुत रमेश शिंदे, आरोपी क्र.३. विशाल रमेश शिंदे , आरोपी क्र. ४. प्रदिप लक्ष्मण शिंदे, आरोपी क्र. ५ रोहीत प्रदीप शिंदे, आरोपी क्र. ६. वैभव राजेंद्र शिंदे व आरोपी क्र. ७. सागर राजेंद्र शिंदे यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३२६, ३२४, ३२३, १४३, ५०४, ५०६ सहकलम १४९ चे दोषारोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपींचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

**३.** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार चे जामीनपत्र द्यावे.

**४.** सदर प्रकरणातील पोलीस स्टेशनला जमा असलेला जप्त मुद्देमाल दोन लाकडांची दांडके व एक लोखंडी कुऱ्हाड हे मुल्यहिन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नाश करण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

VIKAS SARJERAO WAGH

Digitally signed by VIKAS SARJERAO WAGH
Date: 2026.07.28 17:36:13 +0530

दिनांकः २८/०७/२०२६

ठिकाण : फलटण

**(वि. स. वाघ)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, फलटण

जि. सातारा